# पाठ्यक्रम

## विषय – कलाशिक्षण

कलागट : चित्र–शिल्प | इयत्ता ७ वी

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| चित्र | रेखांकन | • **रेषा**<br>गुंतावळ्याच्या रेषा, वलयाकृती रेषा<br>• **आकार**<br>भौमितिक आकार, आलंकारिक आकार, निसर्गातील घटकांचे आकार, मानवनिर्मित वस्तूंचे आकार व मानवाकृती. | पेन्सिल, रंगीत खडू, गेरू, स्केचपेन, जेलपेन, शाईचा पेन, रंगीत पेन्सिली, चारकोल स्टिक्स्, वॅक्स क्रेयान्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इत्यादी. | • गुंतावळ्याच्या रेषा व वलयाकृती रेषा यांची ओळख करून घेतात, रेषा रेखाटनाचा सराव करतात.<br>• भौमितिक आकार, अलंकारिक आकार, निसर्गातील घटकांचे आकार, मानवनिर्मित वस्तूंचे आकार जाणून घेतात, आकार रेखाटनाचा सराव करतात.<br>• भौमितिक आकार रेखाटताना यांत्रिक साधनांचा उपयोग करतात.<br>• विविध प्रकारचे आकार अचूकपणे ओळखतात.<br>• मानवाकृती, निसर्गातील विविध आकारांचे निरीक्षण करतात व रेखाटनाचा सराव करतात.<br>• निरनिराळी माध्यमे हाताळून माध्यम व रेखाटनांचा अनुभव घेतात.<br>• सूचित आकारावर आधारित रेखाटन करतात. |
| | स्मरणचित्र | • **घटना/प्रसंग/दृश्य इत्यादींवर आधारित–**<br>विविध खेळ, सामाजिक प्रसंग, सण/समारंभ/उत्सव,<br>दैनंदिन जीवनातील प्रसंग, पर्यावरण जाणीव जागृती,राष्ट्रीय एकात्मता, मूल्याधारित विषयांवरील चित्रण. | कागद, पेन्सिल, कंपासपेटी–यांत्रिक साधने, जलरंग, ब्रश, जेलपेन, शाईचा पेन, स्केचपेन रंगीत पेन्सिली, चारकोल स्टिक्स, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • निसर्गातील निरनिराळे घटक जसे–झाडे, घरे, प्राणी, पक्षी, ढग, मानव इत्यादीचे आकार व रंगाचे निरीक्षण करतात.<br>• परिसरातील दैनंदिन प्रसंग/घटना/दृश्य इत्यादींचे निरीक्षण करतात.<br>• छोटे प्रसंग, पर्यावरण जाणीव–जागृती, मूल्याधारित विषयांवरील रेखाटन करतात.<br>• आवडीचे रंग वापरून चित्र रंगवितात.<br>• सामूहिक कृतिद्वारा विविध जीवन–कौशल्ये आत्मसात करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कल्पनाचित्र** | • गोष्टीतील काल्पनिक प्रसंग, लोककथा/साहसकथा, पुस्तकातील कथा/ कविता, पंचतंत्रातील कथा, माझे स्वप्न इ. | पेन्सिल, रंगीत खडू, शाईचा पेन, चारकोल स्टिक्स, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, पाठ्यपुस्तकातील कथा, कविता, गोष्टींची पुस्तके, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • परिचित कथा, लोककथा, साहसकथा, गोष्टी व पाठ्यपुस्तकातील काल्पनिक प्रसंग, कविता जाणून घेतात.<br>• स्वत:च्या कल्पना प्रभावीपणे चित्रात रेखाटतात.<br>• रेखाटनात कल्पकतेने रंगांचे उपयोजन करतात.<br>• चित्रातील रेखाटन व रंगकामाच्या नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात.<br>• रेखाटलेल्या चित्राबद्दल स्वत:चे विचार व्यक्त करतात. |
| | **संकल्पचित्र** | • विविध प्रकारच्या रेषा.<br>• नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक आकार.<br>• पुनरावृत्ती तत्त्व व आच्छादन पद्धतीचा वापर<br>• रंग व रंगसंगती.<br>• कोलाज/मुद्रातंत्र व पोत यांचा सर्जनशीलतेसाठी उपयोग | कागद, पेन्सिल, सोनेरी,-रुपेरी कागद, अनुरेखन, कागद, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, कंपासपेटी-यांत्रिक साधने, जलरंग, ब्रश, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, विविध रंग व पोताचे कागद, खळ, डिंक, भेंडी, कांदा, बटाटा, तसेच ठसे घेता येतील अशा अन्य वस्तू, शाई किंवा परिसरातील उपलब्ध साहित्य इ. | • विविध प्रकारच्या रेषा, नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक आकारांची आवडीप्रमाणे रचना करतात.<br>• पुनरावृत्ती, उत्सर्जन तत्त्व, आच्छादन पद्धती समअंग/ विषमअंग पद्धतीचा वापर करतात.<br>• रंग व रंगसंगतीची ओळख करून घेतात आणि चित्रात त्यांचा वापर करतात.<br>• कोलाज, मुद्रातंत्र, पोत इत्यादींचा संकल्प चित्रात सौंदर्यनिर्मितीसाठी उपयोग करतात. |

## इयत्ता ७ वी

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **वस्तुचित्र - निसर्गचित्र** | • दैनंदिन वापरातील वस्तू, बागकाम/शेतीकाम/ विज्ञान प्रयोगासाठी लागणाऱ्या वस्तू, सौंदर्यप्रसाधनाच्या वस्तू, निसर्गनिर्मित घटक, पानाफुलांची डहाळी इ.<br>• ३ ते ४ वस्तूंची सुसंगत वस्तुसमूह-रचना, रेखाटन व रंगकाम. | दैनंदिन वापरातील वस्तू, फळे, फळभाज्या, पेन्सिल, रंगीत खडू, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, रंग, रंगसाहित्य इत्यादी. | • मानवनिर्मित वस्तू, निसर्गनिर्मित घटकांचे निरीक्षण करतात.<br>• वस्तू, फळे, फळभाज्या, पाने-फुले यांचे आकार व आकारांतील लहानमोठेपणा यांतील फरक समजावून घेतात.<br>• सुसंगत वस्तुसमूहाचे रेखांकन करतात.<br>• आवडीच्या रंगांनी वस्तूंचे रंगकाम करतात.<br>• वस्तूंवरील छायाप्रकाशाचे निरीक्षण करतात. |
| | **अक्षरलेखन** | • बाराखडीचे शैलीदार लेखन<br>• सुविचार, सुभाषिते, बोधवाक्य लेखन | पेन्सिल, पेन, शाईचा पेन, जेल पेन, स्केचपेन, रंगीत फलक, खडू, शाई, रंग, ठळक अक्षरे काढता येतील अशी साधने (उदा. बोरू, मार्करपेन, कटनिब्ज),संगणक संच. | • विविध नमुन्यांतील अक्षर लेखनाचा सराव करतात.<br>• फलकावर ठळकपणे अक्षरे काढतात.<br>• विविध साधनांनी अक्षरे काढतात व रंगवतात.<br>• सारख्या जाडीची, उंचीची, समान अंतराची अक्षरे काढतात.<br>• संगणकामधील उपलब्ध विविध प्रकारच्या फॉन्टची ओळख करून घेतात.<br>• अक्षरांत विविध रंग भरण्याचा आनंद घेतात. |
| | **व्यंगचित्र** | • व्यंगचित्रांचे रेखाटन.<br>• व्यंगचित्रांचे शुभेच्छापत्र. | पेन्सिल, पेन, स्केचपेन, रंगीत खडू, शाई, रंग, वर्तमानपत्र-मासिकांतील व्यंगचित्रांचे नमुने, खळ जाड कागद इत्यादी. | • व्यंगचित्रांचा संग्रह करतात.<br>• व्यंगचित्राचे निरीक्षण करून व्यंगचित्र रेखाटने करण्याचा प्रयत्न करतात.<br>• व्यंगचित्र असणारी भेटकार्डे, शुभेच्छा पत्रे तयार करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
| --- | --- | --- | --- | --- |
| | **कलाइतिहास** | • **गाव व परिसरातील–**<br>• कलात्मक स्थळे, निसर्गसौंदर्य असलेली स्थळे.<br>• ऐतिहासिक वास्तू, लेणी, गुहा, किल्ले, संग्रहालये, कलादालने, ग्रंथालये, इ. च्या शक्य त्या क्षेत्रभेटी.<br>कलापरंपरा लोककला कलावंत (मुलाखतीद्वारे) इ. माहितीचे संकलन. | छायाचित्रे, उपलब्ध माहिती पुस्तिका, संदर्भपुस्तके, चित्रपट्टी, स्लाईड्स, सीडीज, पारदर्शिका इत्यादी. | • जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण स्थळांना भेटी देऊन माहिती मिळवितात.<br>• छायाचित्रे, कात्रणे यांचा संग्रह करतात.<br>• सांस्कृतिक, कलात्मक वारशाच्या संवर्धनाचे महत्त्व जाणतात.<br>• कलापरंपरा, लोककला, कलावंत यांची माहिती मिळवितात. |
| **शिल्प** | **मातीशिल्प** | • विविध घनाकृती आकार<br>• लादीवरील उठावशिल्प<br>• शिल्पकृतीचे रंगकाम | परिसरातील उपलब्ध योग्य माती, रंगीत माती (प्ले–क्ले), कुंभारी माती, शाडू माती, मातकामाची साधने, रंग–ब्रश. | • मातकामासाठी योग्य माती तयार करतात.<br>• माती हाताळण्याचे कौशल्य जाणून घेतात.<br>• विविध घनाकृती आकार तयार करतात, द्विमित व त्रिमित आकारांतील फरक ओळखतात.<br>• लादीवरील उठावशिल्पाचे प्रकार जाणून घेतात. अधिक–उणे पद्धतीचा वापर करतात.<br>• शिल्पकृतीचे आवडीप्रमाणे रंगकाम करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कागदशिल्प** | • कागद कापणे,घड्या घालणे, चिकटविणे यांद्वारे कागदी कलाकृती निर्मिती.<br>• कागदी लगदा तयार करणे, लगद्यापासून वस्तू निर्मिती, लगद्याचे मुखवटे. | घोटीव कागद, सोनेरी-रुपेरी कागद, पतंगी कागद, जुनी मासिके, वृत्तपत्रे, पत्रिकांचे कागद, खाकी कागद, क्रेप पेपर यांसारखे अन्य जाड-पातळ कागद, डिंक-खळ, कात्री, कटर, स्केल, इ. किंवा सहज उपलब्ध होईल असे अन्य इतर साहित्य. | • कागदी घड्यांपासून भेटकार्ड, प्राणी, पक्षी यांसारख्या कलाकृती तयार करतात.<br>• कागदाचा लगदा तयार करण्याची प्रक्रिया समजून घेतात.<br>• लगद्यापासून मानवी मुखवटे, प्राणी/पक्ष्यांचे मुखवटे, कागदी वस्तू तयार करून सजावट करतात. |
| | **अन्य माध्यमाचे शिल्प** | • त्रिमित वस्तुनिर्मिती व सजावट.<br>• निकामी/निरुपयोगी वस्तूंच्या उपयोगांतून कलात्मक वस्तुनिर्मिती | रिकामी कागदी खोकी, खेळणी, पणती, गाडगे, (बोळके), बिया, धान्य, टरफले, शंख, शिंपले, मणी, लेस, दोरा, टिकल्या, खळ, डिंक इत्यादी. | • निरुपयोगी वस्तूपासून उपयुक्त व कलात्मक वस्तू बनविण्याचे कौशल्य आत्मसात करतात.<br>• सजावटीसाठी निकामी वस्तू, टरफले, शंख, मणी यांसारख्या वस्तूंचा उपयोग करतात.<br>• रंगीत दगड, शंख, शिंपले यांसारख्या नैसर्गिक वस्तूंचा संग्रह करतात. |

## विषय – कलाशिक्षण

**कलागट : संगीत (गायन–वादन)** **इयत्ता ७ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| गायन | समूहगीत | • संस्कारगीते – व्यक्तिमत्त्व विकास (स्वच्छता गीत, साक्षरता गीत) इ. | हार्मोनियम, उपलब्ध तालवाद्ये, उपलब्ध माध्यमे, गीतसंग्रह, ध्वनिमुद्रण | • संस्कारगीतातील आशय समजून गातात.<br>• संस्कारमूल्यांचे महत्त्व जाणतात.<br>• संस्कारांची रुजवण होते.<br>• सादरीकरणातून आत्मविश्वास व सभाधीटपणा वाढतो.<br>• सादरीकरणामध्ये, सामूहिक गायनातून सफाई व सहजता येते. |
| | स्वरालंकार | • भूपाली रागातील स्वरालंकार | हार्मोनियम | • रागातील विशिष्ट अलंकारांतून रागस्वरूप समजून घेतात.<br>• रागनियमाप्रमाणे स्वरांचे चढउतार समजून घेऊन गळ्यात बसवतात.<br>• रागाचे अलंकार स्वत: तयार करण्यास शिकतात. |
| | शास्त्रीय संगीत | • 'मालकंस' रागाचा परिचय<br>• प्रचलित गीतांद्वारे रागपरिचय<br>• एका शास्त्रीय गायकाचा/गायिकेचा परिचय | हार्मोनियम, ध्वनिमुद्रण, उपलब्ध माध्यमे, गायकाचे छायाचित्र व त्याच्या संबंधित माहितीची कात्रणे व पुस्तके | • रागाच्या आरोह–अवरोहातून मालकंस रागाचा परिचय करून घेतात.<br>• त्या रागातील गाणी ऐकून रागाचे स्वरूप स्पष्ट करून घेतात.<br>• असे स्वर व चाली असलेली इतर गाणी शोधतात.<br>• शास्त्रीय गायकाच्या माहितीतून त्याची ओळख करून घेतात.<br>• गायकाची शैली, त्या क्षेत्रातील कार्य, योगदान इ. ची माहिती प्राप्त करून घेतात. |
| वादन | वादन परिचय | • हवेच्या साहाय्याने ध्वनीनिर्मिती होणाऱ्या सुषीर गटातील वाद्यांचा सचित्र परिचय (हार्मोनियम, बासरी, शहनाई इ.) | चित्रे, प्रतिकृती, हार्मोनियम, ध्वनिमुद्रण (उपलब्ध माध्यमे) वादक कलाकाराचे | • 'सुषीर' वाद्यगटातील वाद्यांचा परिचय व माहिती करून घेतात.<br>• हार्मोनियम वरील स्वरांच्या जागा माहिती करून घेतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | | • हार्मोनियमवर (सा रे ग म प ध नि सा) बोटे ठेवण्याची पद्धत. (चित्राच्या माध्यमातून)<br>• एका वादक कलाकाराचा परिचय | छायाचित्र, माहितीची कात्रणे व पुस्तके, कृतिपुस्तिका | • हार्मोनियम हे वाद्य वाजवण्याची पद्धती सचित्र समजून घेतात.<br>• मूळ स्वरांचे प्राथमिक अलंकार (चित्राच्या माध्यमातून) वाजवतात.<br>• वादक कलाकाराची व त्याच्या वादन शैलीची माहिती करून घेतात.<br>• दृक-श्राव्य माध्यमांद्वारे सादरीकरणाचा अनुभव घेतात व निरीक्षण करतात. |
| | **पार्श्वसंगीत** | • शालेय नाटकासाठी गायन-वादनातून (सूर-तालाच्या माध्यमातून) पार्श्वसंगीत रचना.<br>• उपलब्ध वस्तू आणि टाळ्या, टिचक्या, शीळ इ. कृतींद्वारा ध्वनिनिर्मिती. | हार्मोनियम, तबला, इतर उपलब्ध सूर-तालवाद्ये व वस्तू, शब्दसंदेश, प्रसिद्ध नाटके/ चित्रपटातील (दृश्ये) पार्श्वसंगीताचे ध्वनिमुद्रण.<br>जत्रेतील खेळणी. | • प्रसंगाला/दृश्याला अनुरूप पार्श्वसंगीताचा विचार करतात.<br>• पार्श्वसंगीतासाठी आवश्यक साहित्याची जुळवाजुळव करतात.<br>• विविध ध्वनिनिर्मितीचे व नादनिर्मितीचे प्रयोग करतात.<br>• ध्वनिमुद्रित पार्श्वसंगीत लक्षपूर्वक श्रवण करतात.<br>• पार्श्वसंगीत रचना करतात.<br>• परिणामकारकता वाढवण्याच्या दृष्टीने पार्श्वसंगीताचा उपयोग करतात.<br>• नाट्याशी, पार्श्वसंगीताची सांगड घालून एकात्मिक पद्धतीने सादरीकरण करतात. |

## विषय – कलाशिक्षण

**कलागट : संगीत (नृत्य)** **इयत्ता ७ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नृत्य | हालचाली | • **नृत्यसंरचना**<br>संस्कार गीते,<br>कविता | सी.डी. इंटरनेट, उपलब्ध तालवाद्य,<br>पाठ्यपुस्तके. | • संस्कार गीतांच्या नृत्य सादरीकरणातून सामाजिक जनजागृती करतात. • कवितेचा आशय समजून नृत्यसंरचना करतात.<br>• रस, दृष्टिभेद, हस्तमुद्रा यांचा सहसंबंध साधतात.<br>• लय आणि विविध हालचालींचा मेळ घालतात. |
| | नृत्य परिचय | • **शास्त्रीय नृत्यशैली परिचय**<br>ओडिसी, कुचिपुडी,<br>मणिपुरी | चित्र, इंटरनेट, दूरदर्शनसंच<br>हस्तपुस्तिका,<br>शिल्प/मूर्ती | • प्रस्तुत शास्त्रीय नृत्यशैलींचा परिचय करून घेतात.<br>• प्रांत, वेशभूषा, वाद्ये यांची माहिती जाणून घेतात.<br>• विविध शास्त्रीय नृत्यशैलींतील फरक समजून घेतात.<br>• नृत्य व चित्र–शिल्पकृतींचा संबंध जोडतात.<br>• शास्त्रीय नृत्यशैलींतून राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व जाणून घेतात. |
| | रस परिचय | • **रसांचा परिचय**<br>रौद्ररस,<br>वीररस,<br>भयानकरस | पाठ्यपुस्तकातील चित्रे, वृत्तपत्रे, मासिकांतील चित्रे, दूरचित्रवाणीवरील मालिका, दृश्ये, गोष्टींची पुस्तके. | • प्रस्तुत रसांमधील फरक समजून घेतात.<br>• सादरीकरणात रसांचे असलेले महत्त्व जाणून घेतात.<br>• दृष्टिभेद, हस्तमुद्रा आणि रस यांचा सहसंबंध जोडतात.<br>• प्रस्तुत रसांचे शारीरिक हालचालींमधून प्रकटीकरण करतात.<br>• पाठ्यपुस्तके, गोष्टींची पुस्तके, लेखनसाहित्य, चित्रे यांतील आशयानुरूप रसप्रकार ओळखतात.<br>• रौद्र, वीर आणि भयानक इ. रसांचे कृतींतून प्रकटीकरण करतात. |
| | अभिनय गीत | • **देशभक्तीपर गीतांवर नृत्य**<br>पौराणिक कथांवर आधारित गीतांवर नृत्य | उपलब्ध दृक्–श्राव्य माध्यमे, हार्मोनियम, तबला | • देशभक्तीचे महत्त्व जाणतात.<br>• विशेष व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेतात.<br>• गीतातील भावभावना, रसविचारांतून प्रकट करतात.<br>• पौराणिक कथांतून सांस्कृतिक मूल्यांचे महत्त्व जाणतात. |

## विषय – कला शिक्षण

**कलागट : नाट्य** **इयत्ता ७ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नाट्य | **पायाभूत हालचाली** | • गटागटाने गोष्टीचे संवादविरहित सादरीकरण | पाठ्यपुस्तके, गोष्टींची पुस्तके | • पाठ्यपुस्तकातील व इतर गोष्टींचे गटागटाने, संवादविरहित सादरीकरण करतात.<br>• देहबोलीचे सामर्थ्य जाणून घेतात.<br>• सहभावना व सांघिकता जोपासतात. |
| | **वाचिक अभिनय/ अनुभव कथन** | • पाठ्यपुस्तकातील कवितांचे साभिनय वाचन.<br>• नाटक, दूरदर्शन, चित्रपट, इतर सांस्कृतिक कार्यक्रम | पाठ्यपुस्तके<br>टी.व्ही. सी.डी./<br>डी.व्ही.डी. प्लेअर | • पाठ्यपुस्तकातील कवितांचे भावानुरूप वाचन करतात.<br>• नाटक, दूरदर्शन, चित्रपट व इतर सांस्कृतिक कार्यक्रम पाहून त्यांमधील वाचिक अभिनय, संवादफेक याविषयी चर्चा करतात.<br>• चांगल्या कार्यक्रमांचे रसग्रहण करतात. |
| | **सादरीकरण / एकात्मिक सादरीकरण** | • सामाजिक विषयावर सादरीकरण<br>• चित्र–शिल्पांच्या साहाय्याने सादरीकरण | चित्रे, शिल्पे<br>उपलब्ध साधन साहित्य | • सामाजिक विषयांवर आधारित प्रसंगांचे नाट्य, गटाने सादर करतात.<br>• सादरीकरणाचे निरीक्षण करून परीक्षण करतात.<br>• सामाजिक समस्येवर चर्चा करतात.<br>• सादरीकरणातील योग्य प्रसंगी दाद देतात व प्रशंसा करतात.<br>• सादरीकरण प्रभावी होण्यासाठी चित्र–शिल्पांचा वापर करतात. |
| | **क्लासरूम थिएटर (वर्गनाट्यगृह)** | • जाहिरात फलक (ब्लॅकबोर्ड), रंगमंच, प्रेक्षागृह, बाजूचे भाग (विंग्ज्) | वर्गखोली, वर्गातील फळा, उपलब्ध साधन–साहित्य | • नाट्यप्रसंगानुरूप, वर्गातील साधन–साहित्यांचा उपयोग कल्पकतेने करतात.<br>• वर्गातील उपलब्ध जागेचा सुयोग्य वापर करतात.<br>• सामूहिक सहभागाने व शिस्तीने वर्गनाट्यगृहाची रचना करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **नेपथ्य व तांत्रिक अंगे** | • साहित्य संकलन व निर्मिती<br>• ध्वनिक्षेपक व ध्वनिमुद्रकांचा वापर | ध्वनिक्षेपक, ध्वनिमुद्रक, उपलब्ध साधन-साहित्य | • नाटकाच्या नेपथ्यास आवश्यक साधन-साहित्यांचे संकलन करतात.<br>• उपयुक्त साधन-साहित्यांची निर्मिती करतात. उदा. गदा, ढाल, तलवार, मुकुट इ.<br>• ध्वनिक्षेपक व ध्वनिमुद्रण यंत्राची माहिती घेऊन सुयोग्य वापर करतात. |
| | **नाट्यइतिहास** | • स्थानिक कलाकारांच्या मुलाखती | | • स्थानिक कलावंतांची प्रत्यक्ष माहिती जाणून घेऊन त्याचे संकलन करतात.<br>• स्थानिक कलावंतांची यादी तयार करून कलावंतांची गुणवैशिष्ट्ये जाणून घेतात.<br>• विविध कलाप्रकारांची ओळख करून घेतात. |

## पाठ्यक्रम
## विषय - कला शिक्षण

कलागट : चित्र-शिल्प — इयत्ता ८ वी

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| चित्र | रेखांकन | • **रेषा** – वरीलबाजूस वक्र रेषा, सूचिदर्शक (शिखराकृती) रेषा, गुंतावळ्याची रेषा.<br>• **आकार** – नैसर्गिक, अलंकारिक, भौमितिक, अमूर्त आकार. मानवनिर्मित वस्तूंचे आकार व मानवाकृती | पेन्सिल, रंगीत खडू, मॅजिक स्लेट, शाईचा पेन, जेलपेन, रंगीत पेन्सिली, चारकोल, स्टिक्स, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इत्यादी | • वरील बाजूस वक्र रेषा, सूचिदर्शक रेषा, गुंतावळ्याची रेषा यांची ओळख करून घेतात व रेषा रेखाटनाचा सराव करतात.<br>• नैसर्गिक, अलंकारिक, भौमितिक, अमूर्त आकार, मानवनिर्मित वस्तूंचे आकार जाणून घेतात, आकार रेखाटनाचा सराव करतात.<br>• आकार रेखाटताना यांत्रिक साधनांचा उपयोग करतात.<br>• निसर्गातील विविध आकारांचे निरीक्षण करतात.<br>• विविध प्रकारचे आकार अचूकपणे ओळखतात.<br>• मानवाकृती रेखाटनाचा सराव करतात.<br>• सूचित आकारावर आधारित रेखाटन करतात.<br>• निरनिराळी माध्यमे हाताळून रेखाटनाचा अनुभव घेतात. |
| | स्मरणचित्र | • **घटना/प्रसंग/दृश्य इत्यादींवर आधारित–** विविध खेळ, सामाजिक प्रसंग, सण/समारंभ/उत्सव राष्ट्रीय सण, दैनंदिन जीवनातील प्रसंग,<br>• पर्यावरण जाणीवजागृती,<br>• मूल्याधारित विषयावरील चित्रण इ. | पेन्सिल, रंगीत खडू, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इ. | • निसर्गातील निरनिराळे घटक जसे–झाडे, घरे, प्राणी, पक्षी, ढग, मानव इत्यादींचे आकार व रंगांचे अवलोकन करतात.<br>• परिसरातील विविध खेळ, सामाजिक प्रसंग, दैनंदिन प्रसंग, घटना, दृश्य, सण, समारंभ, उत्सव इत्यादींचे निरीक्षण करतात.<br>• छोटे प्रसंग, पर्यावरण जाणीव जागृती, मूल्याधारित विषयांवरील रेखाटन करतात.<br>• आवडीचे रंग वापरून चित्रे रंगवितात.<br>• सामूहिक कृतिद्वारा विविध जीवन-कौशल्ये आत्मसात करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कल्पनाचित्र** | • गोष्टींतील काल्पनिक प्रसंग, लोककथा/पंचतंत्रातील कथा, पाठ्यपुस्तकातील कथा/कविता, वैज्ञानिक कथा–कल्पना माझे स्वप्न/कल्पनेतील चित्र इत्यादी. | पेन्सिल, शाईचा पेन, स्केचपेन, चारकोल स्टिक्स्, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, पाठ्यपुस्तकातील कथा–कविता, वैज्ञानिक कथा, गोष्टींची पुस्तके, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इत्यादी. | • परिचित कथा, साहसकथा, पौराणिक गोष्टीतील प्रसंग, पंचतंत्रातील कथा, पाठ्यपुस्तकातील काल्पनिक प्रसंग, कविता जाणून घेतात.<br>• स्वत:च्या कल्पना मुक्तपणे रेखाटतात.<br>• रेखाटनात कल्पकतेने रंगयोजना करतात.<br>• रेखाटन व रंगकामाच्या नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात.<br>• रेखाटलेल्या चित्राबद्दल स्वत:चे विचार व्यक्त करतात. |
| | **संकल्पचित्र** | • विविध प्रकारच्या रेषा.<br>• नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक, अमूर्त आकार.<br>• पुनरावृत्ती, उत्सर्जन, लय, तोलबदल, इ. तत्त्वाचा वापर.<br>• रंग व रंगसंगती.<br>• कोलाज/मुद्रातंत्र व पोत इत्यादींचा सौंदर्यनिर्मितीसाठी उपयोग. | कागद, पेन्सिल, सोनेरी,–रुपेरी कागद, अनुरेखन, कागद, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, कंपासपेटी–यांत्रिक साधने, जलरंग, ब्रश, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, विविध रंग व पोताचे कागद, खळ, डिंक, भेंडी, कांदा, बटाटा, तसेच ठसे घेता येतील अशा वस्तू, रंग, शाई किंवा परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इत्यादी. | • विविध प्रकारच्या, नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक आकारांची आवडीप्रमाणे रचना करतात.<br>• पुनरावृत्ती, उत्सर्जन, बदल, तोल इ. तत्त्व, आच्छादन पद्धती आणि समअंग/विषमअंग पद्धतीचा वापर करतात.<br>• विविध वस्तूंच्या बाह्यआकारात संकल्परचना करून स्व–निर्मितीचा आनंद घेतात.<br>• विविध रंग व रंगसंगतीची ओळख करून घेतात आणि चित्रात त्याचा वापर करतात.<br>• कोलाज, मुद्रातंत्र, पोत इत्यादींचा संकल्प चित्रात सौंदर्यनिर्मितीसाठी उपयोग करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **स्थिरचित्र–निसर्गचित्र** | • दैनंदिन वापरातील परिचित मानवनिर्मित, निसर्गनिर्मित वस्तूंच्या सुसंगत समूहाचे चित्रण. (४ ते ५ वस्तूंचा सुसंगत समूह.)<br>• पुरोभूमी व पार्श्वभूमीसह रेखाटन व रंगकाम.<br>• वस्तूंवरील छायाप्रकाश, पोत व रंगछटांसह चित्रनिर्मिती | कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, पेन, जेल पेन, दैनंदिन वापरातील वस्तू, माती–धातूची भांडी, फळे, फळभाज्या, पेन्सिल, रंगीत खडू, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, जलरंग, ब्रश, रंगीत कापड (ड्रेपरी) | • मानवनिर्मित वस्तू, निसर्गनिर्मित घटक यांचे निरीक्षण करतात.<br>• वस्तू, फळे फळभाज्या पाने, फुले, डहाळ्या यांचे आकार व लहानमोठेपणा यांतील फरक समजून घेतात.<br>• सुसंगत वस्तूसमूहाचे रेखाटन करतात.<br>• पार्श्वभूमी, पुरोभूमी वस्तूसमूह यांचे निरीक्षण करतात व वर्गीकरण करतात.<br>• वस्तूंवरील रंगछटा, छायाप्रकाश, पोत यांचा अभ्यास करतात.<br>• आवडीच्या रंगाने वस्तूंचे रंगकाम करतात. |
| | **अक्षरलेखन** | • फलकावर शैलीदार अक्षर लेखन<br>• नामफलक लेखन,<br>• नामातील भावानुसार लेखन<br>• उत्तम शीर्षकांचा संग्रह. | पेन्सिल, पेन, स्केचपेन, शाईचा पेन, जेल पेन, रंगीत खडू, शाई, रंग, बोरू, मार्कर पेन, अंक–अक्षरांच्या स्टेन्सिल्स, संगणकसंच, विविध रंग व जाडीचे कागद, खळ, दोरा. | • प्रसंगानुसार फलकावर अक्षरलेखन करून सजावट करतात.<br>• शब्दांच्या भावानुसार अक्षरे रेखाटतात.<br>• अक्षरांच्या स्टेन्सिल्स बनवतात, त्याआधारे अक्षरे गिरवतात.<br>• अक्षरलेखनासाठी संगणकाचा उपयोग जाणून घेतात.<br>• जाड कागदांचे अंक, अक्षरे कापून प्रसंगानुरूप त्याचे संयोजन करतात. |
| | **व्यंगचित्र** | • वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वाच्या व्यंगचित्रांचा संग्रह<br>• स्वत:ला आवडणाऱ्या विषयावर व्यंगचित्राचे रेखाटन<br>• ॲनिमेशन तंत्राचा परिचय | पेन्सिल, पेन, स्केचपेन, जेल पेन, रंगीत खडू, शाई, रंग, मार्कर पेन, वर्तमानपत्रे–मासिकातील व्यंगचित्रांचे नमुने, खळ इत्यादी. दृकश्राव्य माध्यमे | • व्यंगचित्रांचे निरीक्षण करतात<br>• व्यंगचित्रांचा संग्रह करतात.<br>• प्रसंगानुरूप आवडणाऱ्या विषयावर व्यंगचित्रे काढतात.<br>• व्यंगचित्रांच्या कात्रणातून सलग चित्रकथा तयार करतात.<br>• ॲनिमेशनसारख्या तंत्रांची माहिती मिळवतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कलाइतिहास** | • **राज्याची कलापरंपरा-** प्राचीन संस्कृती अवशेष, आदिम कला, लोककला, समकालीन कला, महाराष्ट्रातील कलासंग्रहालये, कलादालने, कलाशिक्षण संस्था इत्यादी. | चित्रे, छायाचित्रे, उपलब्ध माहितीपुस्तिका, संदर्भ पुस्तके, चित्रपट्टी, स्लाईड्स, सीडीज, पारदर्शिका, प्रतिकृती इत्यादी. | • प्राचीन संस्कृती अवशेष, आदिम कला, लोककला, समकालीन कला इत्यादींची माहिती मिळवितात.<br>• कला संग्रहालये, कलादालने, कलाशिक्षण संस्था इत्यादींच्या क्षेत्रभेटी, माहितीद्वारे विविध प्रकारची माहिती घेतात.<br>• प्राचीन कला व स्वनिर्मित रेखाटनाची सांगड घालतात.<br>• कलाशिक्षण संस्थांची माहिती मिळवितात. |
| **शिल्प** | **मातीशिल्प** | • विविध घनाकृती आकार<br>• विविध प्रकारच्या सोप्या वस्तू, मुखवटे, मानवाकृती इत्यादी.<br>कुंभारकाम, मातीकाम करणाऱ्यांची माहिती<br>• लादीवरील उठावशिल्प, अधिक-उणे पद्धतीचा वापर.<br>• साचा तयार करणे.<br>• शिल्पकृतीचे रंगकाम | परिसरातील उपलब्ध योग्य माती, रंगीत माती (प्ले-क्ले), कुंभारी माती, शाडू माती, मातकामाची साधने, (टूल्स) रंग-ब्रश इत्यादी. | • मातकामासाठी योग्य माती तयार करतात.<br>• मातकामाचे कौशल्य आत्मसात करतात.<br>• विविध घनाकृती आकारांतील फरक ओळखून घनाकृती तयार करतात.<br>• अधिक-उणे पद्धतीचा वापर करून शिल्पनिर्मिती करतात व रंगकाम करतात.<br>• मातीचा साचा तयार करण्याची पद्धती समजून घेतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कागदशिल्प** | • कागदी लगद्याचे मुखवटे.<br>• लगद्यापासून वस्तू निर्मिती.<br>• कागद व इतर आधारभूत साहित्य घेऊन कलाकृती निर्मिती | घोटीव कागद, सोनेरी–रुपेरी कागद, पतंगी कागद, जुनी मासिके, वृत्तपत्रे, पत्रिकांचे कागद, खाकी कागद, क्रेप पेपर यांसारखे अन्य जाड–पातळ कागद, डिंक–खळ, कात्री, कटर, स्केल, व उपलब्ध इतर साहित्य, रंगसाहित्य, कागदी लगदा इत्यादी. | • कागदी लगदा हाताळण्याची पद्धत जाणून घेतात.<br>• कागद व इतर आधारभूत साहित्य घेऊन आवडीची त्रिमित कलाकृती तयार करतात.<br>• लगद्यापासून प्राणी, पक्षी, मानवी चेहरे इत्यादींचे मुखवटे, वस्तू तयार करतात.<br>• मुखवटे आवडीच्या रंगांनी रंगवतात.<br>• सामूहिक कृतिद्वारा विविध जीवन–कौशल्ये आत्मसात करतात. |
| | **अन्य माध्यमाचे शिल्प** | • त्रिमित वस्तू निर्मिती<br>• त्रिमित वस्तूची सजावट.<br>• निकामी/निरुपयोगी वस्तूंच्या उपयोगांतून कलात्मक वस्तू निर्मिती | रिकामी कागदी खोकी, खेळणी, पणती, गाडगे, (बोळके), बिया, धान्य, टरफले, शंख, शिंपले, मणी, लेस, दोरा, टिकल्या, खळ, डिंक इत्यादी. | • निरुपयोगी / निकामी वस्तूंचा संग्रह करतात.<br>• परिसरातील सहज उपलब्ध होतील अशा निरुपयोगी वस्तूंचा शिल्पसजावटीसाठी उपयोग करतात.<br>• निरुपयोगी वस्तूपासून कलात्मक/उपयुक्त वस्तू बनविण्याचे कौशल्य आत्मसात करतात. |

## विषय - कला शिक्षण

**कलागट : संगीत (गायन-वादन)** **इयत्ता ८ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| **गायन** | **समूहगीत** | • सामाजिक जाणिवांचे महत्त्व सांगणारी गीते (पर्यावरण, लोकसंख्या, अंधश्रद्धा निर्मूलन)<br><br>• विविध धर्मांतील प्रार्थना. | हार्मोनियम, उपलब्ध ताल-वाद्ये, गीतसंग्रह, उपलब्ध माध्यमे (ध्वनिमुद्रण) | • गीतातील आशय समजून गातात.<br>• सामाजिक जाणिवा वाढीस लागतात.<br>• अशाप्रकारच्या गीतांतून सामाजिक प्रश्नांविषयीचे ज्ञान मिळवतात.<br>• एकसंघतेने सामूहिक सादरीकरण करतात.<br>• आत्मविश्वासातून सफाई, सहजता व धीटपणा येतो.<br>• समूहगीतातून विविध प्रकारच्या भावना व भाव व्यक्त करतात.<br>• विविध धर्मांतील प्रार्थनेचे महत्त्व जाणून घेतात व राष्ट्रीय एकतेची भावना जोपासतात. |
| | **स्वरालंकार** | • 'मालकंस' रागातील स्वरालंकार | हार्मोनियम, तयार केलेली सी.डी. | • रागातील सोप्या अलंकारांतून रागस्वरूप समजून घेतात.<br>• रागनियमाप्रमाणे स्वरांचे चढ-उतार समजून घेऊन त्या प्रमाणे गातात. कोमल स्वरांविषयी संकल्पना समजून घेतात. |
| | **शास्त्रीय संगीत** | • मागील दोन रागांच्या बंदिशी<br><br>• एका शास्त्रीय गायकाचा परिचय | ध्वनिमुद्रण (उपलब्ध माध्यमे) हार्मोनियम, तयार केलेली सी.डी., गायकाचे छायाचित्र, माहिती, कात्रणे, कृतिपुस्तिका | • 'बंदीश' या शास्त्रीय गीत प्रकाराची माहिती घेतात.<br>• बंदिशीतून रागस्वरूप समजून घेतात.<br>• उपलब्ध माध्यमांतून बंदिशीच्या सादरीकरणाचा अनुभव घेतात.<br>• माहितीद्वारे शास्त्रीय गायकाचा परिचय करून घेतात.<br>• गायकाचे त्या क्षेत्रातील कार्य, योगदान इ. ची माहिती घेतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| वादन | वादन परिचय | • एका वादक कलाकाराचा परिचय<br>• 'त्रितालाचा' परिचय<br>• आधुनिक वाद्य परिचय (गिटार, सिंथेसायझर इ.) | कलाकाराचे छायाचित्र, माहिती, कात्रणे, तबला, आधुनिक वाद्यांची चित्रे, उपलब्ध प्रतिकृती, तयार केलेली सी.डी. | • वादक कलाकाराचा परिचय करून घेतात.<br>• त्याच्या वादनशैलीची माहिती व त्याचे त्या क्षेत्रातील योगदान समजून घेतात.<br>• 'त्रिताल' या तालाची माहिती (मात्र, काल, खंड इ.) करून घेतात व हातावर देण्याचा ठेका समजून घेतात.<br>• आधुनिक वाद्यांविषयीची माहिती घेतात.<br>• दृक-श्राव्य माध्यमांद्वारे ताल, वाद्ये इ. चे सामान्य ज्ञान मिळवतात. |
| | पार्श्वसंगीत | • स्वतंत्र वाद्यवृंद तयार करणे | हार्मोनियम, तबला, इतर उपलब्ध सूरताल वाद्ये, उपलब्ध वस्तू, शब्दसंदेश पूर्वध्वनिमुद्रित पार्श्वसंगीत. | • स्वररचना करताना रसनिर्मितीचा आनंद घेतात.<br>• स्वररचनेला पूरक तालवाद्यांची बांधणी करू लागतात.<br>• संगीताशी समरस होऊन एकत्रित, एकात्मिक पद्धतीने सादरीकरण करतात.<br>• पार्श्वसंगीत निर्मितीसाठी कल्पकतेचा वापर करतात.<br>• ध्वनिमुद्रित पार्श्वसंगीत लक्षपूर्वक श्रवण करतात. |

## विषय – कला शिक्षण

**कलागट : संगीत (नृत्य)** **इयत्ता ८ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नृत्य | हालचाली | • **नृत्यसंरचना**<br>पर्यावरण गीत<br>सादरीकरण/संकलन | सी.डी. उपलब्ध तालवाद्य, उपलब्ध दृक्–श्राव्य माध्यमे | • हस्तमुद्रा, रस, दृष्टिभेद यांचा समन्वय प्रस्तुत संरचनेतून साधतात.<br>• पर्यावरणपूरक निसर्गगीतांच्या कवितांचा संग्रह करतात.<br>• आकर्षक हालचालींतून पर्यावरणाविषयी परिणामकारक जाणीव जागृती करतात.<br>• नृत्यांतून, निसर्गातील घटना व दृश्यांचे कल्पकतेने सादरीकरण करतात. |
| | नृत्य परिचय | • **शास्त्रीय नृत्यशैली परिचय**<br>मोहिनी अट्टम,<br>कथकली<br>(चित्रसंग्रह, चर्चा) | चित्र, हस्तपुस्तिका, उपलब्ध दृक्–श्राव्य माध्यमे | • प्रस्तुत शास्त्रीय नृत्यशैलींचा परिचय करून घेतात.<br>• प्रांत, वेशभूषा, वाद्य यांची माहिती जाणून घेतात.<br>• विविध शास्त्रीय नृत्यशैलींतील फरक समजून घेतात.<br>• भारतीय नृत्यशैलींचे महत्त्व जाणून घेतात.<br>• शिल्प व चित्रांतील नृत्यकृतीविषयी माहिती घेऊन स्वतःचे मत व्यक्त करतात.<br>• त्यांमधील सौंदर्यविषयक बाबींवर चर्चा करतात.<br>• नृत्यशैलींची माहिती, कात्रणे, चित्रे यांचा संग्रह करतात. |
| | रस परिचय | • **रसांचा परिचय**<br>अद्‌भुत<br>बीभत्स<br>शांत | पाठ्यपुस्तकातील चित्रे, वृत्तपत्रे, मासिकांतील चित्रे, दूरचित्रवाणीवरील मालिका, दृश्य, गोष्टींची पुस्तके, उपलब्ध दृक्–श्राव्य माध्यमे | • प्रस्तुत रसांमधील फरक समजून घेतात.<br>• सादरीकरणात रसांचे महत्त्व जाणून घेतात.<br>• दृष्टिभेद, हस्तमुद्रा आणि रस यांचा सहसंबंध जोडतात.<br>• पाठ्यपुस्तके, गोष्टींची पुस्तके, लेखनसाहित्य, चित्रे यांतील आशय समजून रसांची ओळख सांगतात.<br>• या तीन रसांसह सर्व नऊ रसांचे कृतींतून प्रकटीकरण करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
| --- | --- | --- | --- | --- |
| | • **अभिनय गीत** | संगीत, नाट्य आणि चित्र-शिल्प यांचे एकात्मिक सादरीकरण<br>• कथानकांवर आधारित | गोष्टींची पुस्तके, उपलब्ध वाद्य,<br>दृक्-श्राव्य माध्यमे | • विविध कथांचा संग्रह करतात व वाचन करतात.<br>• अभिनय सादरीकरणात रस, दृष्टिभेद, हस्तमुद्रा यांचा योग्य उपयोग करतात.<br>• उद्बोधक कथानकांद्वारे संगीत, नाट्य, चित्र-शिल्प व नृत्य इत्यादी कलांच्या एकत्रित सादरीकरणातून सामाजिक संदेशही देतात. |

कलागट : नाट्य | विषय – कला शिक्षण | इयत्ता ८ वी

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नाट्य | **पायाभूत हालचाली** | • विविध प्रसंग, गोष्टी, कथा इत्यादींचे, गटाने संवादविरहित सादरीकरण.<br>• समन्वय साधणाऱ्या समूहाच्या हालचाली उदा. रेल्वे प्रवासी, परेड इ. | पाठ्यपुस्तके, गोष्टींची पुस्तके | • पाठ्यपुस्तकातील प्रसंग, गोष्टी, कथा यांचे, गटाने संवाद–विरहित सादरीकरण करतात.<br>• देहबोलीचे सामर्थ्य, प्रभावी अभिनयासाठी जाणून घेतात.<br>• सहभावना व सांघिकता जोपासतात.<br>• शारीरिक हालचालीतून गटागटांनी छोट्या कृती करतात. |
| | **वाचिक अभिनय/ अनुभव कथन** | • पाठ्यपुस्तकातील पाठांचे साभिनय वाचन. नाटक, चित्रपट, दूरचित्रवाणी, देशभक्तीपर कार्यक्रम | पाठ्यपुस्तके उपलब्ध साधन – साहित्य दूरदर्शन, सी.डी./ डी.व्ही.डी. प्लेअर इत्यादी. | • पाठ्यपुस्तकातील पाठांचे भावांनुरूप साभिनय वाचन करतात.<br>• नाटक, दूरदर्शन, चित्रपट व इतर सांस्कृतिक कार्यक्रम पाहून त्यांमधील वाचिक अभिनय, संवादफेक याविषयी चर्चा करतात.<br>• चांगल्या कार्यक्रमाचे रसग्रहण करतात.<br>• उत्कृष्ट कार्यक्रमाचे निरीक्षण करून नक्कल करण्याचा प्रयत्न करतात.. |
| | **सादरीकरण / एकात्मिक सादरीकरण** | • सामाजिक समस्यांवर नाट्यलेखन.<br>• पाठ्यपुस्तकातील कवितांचे सादरीकरण.<br>नाट्य–गायन–वादन, चित्र–शिल्प एकात्मिक सादरीकरण<br>• बाहुलीनाट्य व छायानाट्य एकात्मिक सादरीकरण | उपलब्ध साधन साहित्य पाठ्यपुस्तक एकात्मिक सादरीकरणास उपयुक्त साहित्य.<br>बाहुलीनाट्य व छाया–नाट्यास उपयुक्त साहित्य | • सामाजिक समस्या जाणून घेऊन त्यावर आधारित प्रसंगांच्या नाट्यलेखनाचा प्रयत्न करतात.<br>• सामाजिक समस्येवर चर्चा करतात.<br>लिहिलेल्या प्रसंगाचे नाट्यीकरण करून सादरीकरण करतात.<br>• चित्र–शिल्प, नृत्य, गायन–वादन या कलांचा उपयोग करून नाट्याचे सादरीकरण करतात.<br>• बाहुलीनाट्य व छायानाट्य यांचे एकात्मिक सादरीकरण करतात.<br>• सादरीकरणातील योग्य प्रसंगी दाद देतात व कौतुक करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **दिग्दर्शन** | • आशयाची समज, गटाचे नेतृत्व, गटकार्य<br>• पाठ्यपुस्तकातील संवाद-रूपी धड्याचे सादरीकरण | पाठ्यपुस्तके | • योग्य पात्रांची निवड करतात.<br>• आशयानुरूप अभिनयाचे मार्गदर्शन करतात.<br>• अभिनय व पूरक साधनांचा ताळ-मेळ घालतात.<br>• आशयानुरूप संवाद-उच्चारणाचे मार्गदर्शन करतात. |
| | **क्लासरूम थिएटर (वर्गनाट्यगृह)** | • रंगमंचाचा नकाशा | उपलब्ध साधन-साहित्य, फळा, रंगमंच, प्रेक्षागृह, बाजूचे भाग (विंग्ज्), उपलब्ध) साहित्य | • रंगमंचाचा नकाशा जाणून घेतात.<br>• रंगमंचाची, नकाशाच्या आधारे व उपलब्ध साहित्याद्वारे मांडणी करतात.<br>• सादरीकरण करण्यास वर्गनाट्यगृह सुसज्ज करतात. |
| | **नेपथ्य व तांत्रिक अंगे** | • रंगमंच प्रतिकृती, रंगभूषा, वेशभूषा, ध्वनिक्षेपण ध्वनिमुद्रण, प्रकाशयोजना- कंपासपेटी, डबा, आरसा वापरून. | उपलब्ध साधन-साहित्य रंगभूषा, वेशभूषा प्रकाशयोजना, ध्वनिक्षेपण, ध्वनिमुद्रण यासाठी आवश्यक साधन साहित्य आरसा, चकचकीत कंपासपेटी, ताटली | • उपलब्ध साधन साहित्यापासून रंगमंचाची प्रतिकृती तयार करतात.<br>• तयार प्रतिकृतीचे निरीक्षण करून चर्चा करतात.<br>• रंगभूषेचा अभ्यास करून भूमिकेप्रमाणे एकमेकांची रंगभूषा/वेशभूषा करतात.<br>• सादरीकरणातील विषयानुसार देखावा तयार करतात.<br>• ध्वनिक्षेपक, ध्वनिमुद्रक व उपलब्ध प्रकाशयोजनेचा कल्पकतेने वापर करतात. |
| | **नाट्यइतिहास** | • भरतमुनींचे नाट्यशास्त्र व मराठी रंगभूमी<br>• स्थानिक परिसरातील, नाट्यपरंपरांची माहिती उदा. दशावतार, वग | उपलब्ध पुस्तके, परिसरातील नाट्य तज्ज्ञ | • भरतमुनी व नाट्यशास्त्र यांची प्राथमिक माहिती-संकलनाचा प्रयत्न करतात.<br>• मराठी रंगभूमीची उपलब्ध पुस्तके व परिसरातील नाट्य तज्ज्ञांकडून माहिती संकलित करतात.<br>• स्थानिक व परिसरातील नाट्य परंपरांची माहिती घेतात. |

# मूल्यमापन निर्देश

कला शिक्षण या विषयाचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करण्यासाठी दि. २० ऑगस्ट, २०१२ च्या शासननिर्णयामध्ये स्वतंत्र सूचना दिल्या आहेत. भाषा, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, गणित इ. विषयांच्या तुलनेने या विषयांमध्ये अधिक मूर्त स्वरूपातील कृती – अभिव्यक्ती प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकडून अपेक्षित आहेत. हा विषय कौशल्याधिष्ठित आहे. या विषयाबाबत लेखी काम नगण्य आहे. त्यामुळे या विषयाचे केवळ आकारिक मूल्यमापन करायचे असून संकलित मूल्यमापन अपेक्षित नाही. आकारिक मूल्यमापनासाठी विहित केलेल्या आठ साधनतंत्रांपैकी किमान तीन साधन–तंत्रे वापरावयाची आहेत. त्यामध्ये निरीक्षण हे तंत्र वापरणे अनिवार्य आहे परंतु गुणदानामध्ये त्यासाठी भारांश शून्य आहे. उरलेल्या साधनांमधून किमान दोन साधन–तंत्रांची निवड करायची आहे. या विषयाचे कौशल्याधिष्ठित स्वरूप लक्षात घेता प्रात्यक्षिक प्रयोग व उपक्रम–कृती या तंत्रांची निवड प्राधान्याने करावी लागेल. आशयाच्या स्वरूपावरून प्रकल्प आणि तोंडीकाम याही तंत्रांना योग्य ते स्थान द्यावे लागेल. शासननिर्णयानुसार तीन तंत्रांपेक्षा अधिक तंत्रे वापरण्याची मुभा आहे.

गुणदानामध्ये निरीक्षण या तंत्राला शून्य भारांश आहे. इतर तंत्रांना आशय आणि व्याप्ती पाहून योग्य तो भारांश द्यायचा आहे.

विज्ञान–गणित इ. विषयांचे मूल्यमापन जेवढ्या वस्तुनिष्ठतेने करता येते तसे या विषयातील कृती/कौशल्याचे मूल्यमापन करता येत नाही. त्यामुळे अगदी काटेकोर मूल्यमापनाची अपेक्षा करता येणार नाही. ही या विषयाची मर्यादा आहे. परंतु विद्यार्थ्यांची कृती/आविष्कार कसे असावेत यांच्या निकषांची यादी करून त्यानुसार मूल्यमापन केले तर वस्तुनिष्ठता वाढण्यास मदत होईल.

विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्त्व व त्याचा विकास यांचा वेध घेण्याच्या दृष्टीने या विषयाचे आगळे स्थान आहे. या विषयासंदर्भातील कृती करताना आविष्कार दाखविताना विद्यार्थ्यांचे वर्तन इतर विषयांच्या तुलनेने अधिक नैसर्गिक असते. या अवस्थेत विद्यार्थ्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू सहजपणे लक्षात येण्याची संधी असते. जाणीवपूर्वक निरीक्षण करून ही संधी घेता येईल. इतर विषयांमध्ये फारशी रूची किंवा प्रगती न दाखवण्यास काही विद्यार्थ्यांना या विषयामध्ये गती असल्याचे जाणवू शकेल. या विद्यार्थ्यांना हेरून या विषयात अधिक प्रगती करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करता येईल. त्यांची या विषयातील रुची कायम राहावी, कौशल्य वाढावे यादृष्टीने त्यांना वर्गातील/शाळेबाहेरील कार्यक्रम/ उपक्रमांत सहभाग देण्याचे नियोजन करता येईल.

या विषयाचे स्वरूप दृश्य/मूर्त असल्यामुळे या विषयातील संपादणूक व या विषयातून होणारा व्यक्तिमत्त्व विकास या विषयीचे मूल्यमापन दैनंदिन तासिकातील कृती–उपक्रम–प्रात्यक्षिके तसेच प्रकल्पातून करणे सहजशक्य आहे. परंतु याचबरोबर इतर विषयांच्या तासिकांमध्येही या विषयांच्या मूल्यमापनाला वाव आहे. उदाहरणार्थ, भाषा शिकविताना चित्रे काढणे, रंग देणे, नृत्य, गायन अशा कृतींचा समावेश असू शकतो. भूगोल, विज्ञानामध्ये भौमितिक आणि मुक्तहस्त आकार काढावे लागतात. त्यामुळे इतर इतर विषयांच्या अध्यापनातून देखील कला विषयासंबंधित मूल्यमापन करण्याची

संधी घेतली पाहिजे. अशाच प्रकारे निरनिराळ्या सहशालेय उपक्रमांचा वापरदेखील या विषयाच्या मूल्यमापनासाठी करता येईल.

या विषयात प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांनी मुक्त आविष्कार करावा; त्यात त्यांच्या कल्पना, सर्जनशीलता, अनुभव यांचे प्रतिबिंब असावे अशी अपेक्षा आहे. स्वतःच्या प्रौढ अनुभवांच्या पार्श्वभूमीवर कृती एखाद्या विशिष्ट प्रकारे असण्याविषयी आग्रह, सूचना, दुरुस्त्या करणे योग्य ठरणार नाही. मुलांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि आनंद यांना धक्का लागणार नाही याची काळजी मूल्यमापन करताना घ्यायला हवी असे वातावरण निर्माण करणे व कायम ठेवणे ही भूमिका शिक्षकांकडून अपेक्षित आहे.

कलाशिक्षण या विषयाचे मूल्यमापन करताना किमान तीन साधने / तंत्रे वापरावयाची असली तरी अभ्यासक्रमातील आशयानुरूप तीनपेक्षा अधिक तंत्रे वापरता येतील. त्यामुळे मूल्यमापन अधिक योग्यप्रमारे होईल. उदा. कलाइतिहास घटकाचे अध्यापन होत असेल तर ऐतिहासिक वास्तूंची माहिती, कलाकारांचा परिचय, माहिती अशा स्वरूपाचे प्रकल्प करता येतील. इथे तोंडी, प्रात्यक्षिक अशी तंत्रे घटकाला पुरेसा न्याय देऊ शकणार नाहीत. तसेच प्रत्यक्ष आणि गाणी म्हणवून घेऊन मूल्यमापन करण्यासाठी तोंडीकाम (शास्त्रीय भागावरचे माहिती विचारणारे प्रश्न) वा प्रात्यक्षिक असेच तंत्र वापरावे लागेल.

कलेमध्ये सादरीकरण आणि कलाकृती (मूर्त) अशा दोन प्रकारच्या आविष्कारांचे मूल्यमापन करावे लागते. चित्र–शिल्प या कलाविष्कारांसाठी प्रत्यक्ष कलाकृती बघून मूल्यमापन म्हणजे चित्रातील रंगसंगती कल्पना इ. तर शिल्पाकृतीतील प्रमाणबद्धता, आकार अशासारख्या बाबींचे परीक्षण करता येईल, असे प्रकल्प, उपक्रम एका ठरावीक वेळी घेऊन नंतर सवडीने त्यांचे मूल्यमापन करण्यास वाव आहे. परंतु संगीत (गायन–वादन–नृत्य), नाट्याच्या बाबत असे करता येणार नाही. सादरीकरणाच्या वेळी किंवा त्यानंतर लगेच निरीक्षण नोंदवावे लागेल.

आविष्कार मूर्त असो की अमूर्त असो, एखाद्याच निरीक्षणावरून विद्यार्थ्याचे कौशल्य, आवड इत्यादी विषयी निष्कर्ष काढण्याची घाई करणे योग्य ठरणार नाही. वर्गात, शालेय परिसरात, सहशालेय उपक्रमाच्या वेळी सातत्याने निरीक्षण केल्यानंतर याविषयी काही मत तयार होणे शक्य आहे. अशा वेळी केलेल्या नोंदी अधिक वास्तव असतील. सातत्यपूर्ण निरीक्षण करताना काही सामान्य (general) निकष डोळ्यांसमोर ठेवले तर या विषयात संभवणारी व्यक्तिनिष्ठता कमी होईल. उदा. गायनाबाबत :–

- सामूहिक रीतीने घेतल्यास सहभागी होतो.
- एकट्याला गायला सांगितले तरी धीटपणे सहभागी होतो.
- ताल–सूर कळतो – चालीवर तसेच कवितेमधील आशय समजून कविता म्हणतो – अशा प्रकारच्या निकषांची यादी करता येईल.

मूल्यमापनातून प्रगती साधायची असेल तर कलेमध्ये विद्यार्थी जे जे रुची किंवा प्रगती दाखवतील ते त्यांचे यथा योग्य रीतीने कौतुक व्हायला हवे. उणिवा दिसल्यास नाउमेद होणार नाहीत अशा प्रकारे त्यांची सकारात्मक हाताळणी करायला हवी. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे यांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या अंमलबजावणी संदर्भात शिक्षकांसाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिका तयार केल्या आहेत. त्यांचा संदर्भ अध्यापनाचे नियोजन करताना अवश्य घ्यावा.